नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

दिनांक 11/02/2021 (गुरूवार)
(सायंकाळ)

---

## गळफास लावून मृत्यु

पो.स्टे. कोंढाळी :– अंतर्गत 07 कि. मी. मौजा मासोद येथे दिनांक 09/02/2021 चे 17.00 वा. दरम्यान फिर्यादीचा नातु नामे– आयुष पुष्पराज धारपुरे(मृतक), वय 12 वर्ष, रा. मासोद हा लहान मुलाच्या पाळण्या जवळ खेळत असतांना खेळता खेळता त्याला नायलॉन दोरीने गळफास लागली त्यामुळे त्याचा जागीच मृत्यु झाला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– सौ. मंगला विनायक धारपुरे वय 65 वर्ष, रा. मासोद यांचे रिपोर्टवरुन पो. स्टे. कोंढाळी येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस शिपाई गौरव मोकळे 9730355184 हे करीत आहे.

## अकस्मात मृत्यू

पो.स्टे. उमरेड :– अंतर्गत 01 कि. मी. अंतरावर मंगळवारी पेठ उमरेड येथे दिनांक 04/02/2021 चे 19:30 वा. ते 20.00 वा. दरम्यान सौ. निलीमा राजकुमार नाईक(मृतक), वय 37 वर्ष रा. मंगळावारीपेठ उमरेड ही तिचे घरी फरशीवर गॅस शेगडी ठेवुन स्वयंपाक करतांना रॅक मधील सामान काढतांना जळत्या गॅसची अंगार तिने नेसलेल्या कपडयाला लागुन ति जळली. मृतक जळाल्याने तिला प्रथम उपचाराकरिता पीएचसी उमरेड नंतर मेडीकल कॉलेज नागपुर येथे भरती केले असता उपचारा दरम्यान दि. 08/2/21 चे 07.00 वा. डाक्टरांनी मृत घोषित केले. पो. स्टे. उमरेडला सदरचे कागदपत्र प्राप्त झाल्याने सदर मर्ग नोद.

सदर प्रकरणी सरतर्फ पोहवा राजेश माकडे मेडीकल पोलिस बुथ नागपुर यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. उमरेड येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस हवालदार संजय कुलकर्णी 9422818062 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर